नागपूर

# महासागर वृत्तसागर

शनिवार, दि. २, ऑगस्ट २०२५

## ५ वाहन चोराकडून ३ वाहने जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

सदर पोलिसांनी ठाण्यात नोंद वाहन चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावून एका अट्टल वाहन चोराला अटक केली. चौकशीत त्याच्याकडून वाहन चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले. कपिल उर्फ महाकाल अशोक गौरे (35) रा. प्रेमनगर, गिट्टीखदान असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीचे तिन्ही वाहन जप्त केले आहेत. कपिल हा अभिलेखावरील गुन्हेगार असून त्याच्यावर इतरही गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली आहे. फिर्यादी शाकीर मोहम्मद लिलवाल रा. गंगा अपार्टमेंट, सदर हे गत 25 जूनच्या सायंकाळी इंदोरला गेले होते. या दरम्यान त्यांची एमएच-31/एफडी-7753 क्रमांकाची दुचाकी अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये ठेवली होती. अज्ञात आरोपीने पार्किंगमधून त्यांची दुचाकी चोरी केली. 7 जुलैला शाकीर परतले असता त्यांची दुचाकी गायब होती. त्यांच्या तक्रारीवरून सदर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिस कपिलपर्यंत पोहोचले. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने शाकीर यांची दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. कपिलला अटक करून त्याची पोलिस कोठडी घेण्यात आली. ही कारवाई वपोनि मनिष ठाकरे यांच्या नेतृत्वात पोउपनि नीलेश घोगरे, पोहवा मोहनसिंग ठाकूर, संदीप शेळके, दुर्गेश ठाकूर, पोशि आशिष बहाळ, नीलेश लोंदे, अंकीत ठाकरे, पंकज तिवारी, आशिष जाधव, बालाजी गुट्टे आणि ज्ञानेश्वर यांनी केली.

# मनपातर्फे १७७ जणांना नियुक्तीचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

गेल्या डिसेंबरमध्ये महानगर पालिकांमध्ये ५ संवगार्साठी सुरू केलेली भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून १७७ जणांना नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. नागपूर महानगरपालिकेने यावर्षी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता (विद्युत), वृक्ष अधिकारी, नर्स परिचारीका) अशा एकूण 5 संवर्गाकरीता डिसेंबर २०२५ मध्ये जाहीरात प्रसिद्ध केली होती. ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि ऑनलाईन पद्धतीने यशस्वीरित्या पूर्ण झाली. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाचे एकूण 25 जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाचे 104, कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदाचे 3, वृक्ष अधिकारी या पदाचे 4, नर्स परिचारीका या पदाचे 41 अशी एकूण 177 नियुक्ती आदेश 31 जुलै 2025 रोजी संबंधित उमेदवारांचे पत्त्यावर रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविण्यांत आले आहेत.

गेल्या काही वर्षात एवढ्या मोठ्या प्रमाणात मनपा तर्फे पहिल्यांदा भरती करण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ अभिजीत चौधरी यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्र शासनाने भरती करण्याचे निर्देश महानगरपालिकेला दिले आणि यशस्वीरित्या भरती पार पडली.

नागपूर महानगरपालिका तर्फे पदभरती संबंधाने जा?हिरात क्र. 804/पी.आर. दिनांक 23/12/2024 अन्वये (कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता (विद्युत), वृक्ष अधिकारी, नर्स परिचारीका) अशा एकूण 5 संवर्गाकरीता 245 पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर पदाकरीता शासन अधिकृत बाह्य संस्थेमार्फत या पदाकरीता ऑनलाईन स्वरुपात लेखी परिक्षा दिनांक 20 मार्च ते 27 मार्च 2025 या दरम्यान उमेदवाराच्या सोयीच्या दृष्टीने महाराष्ट्रातील 27 शहरात पारदर्शक पध्दतीने घेण्यांत आली होती. परिक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही., जॅमर, पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आलेला होता. तसेच परिक्षेवर नियंत्रण ठेवण्याकरीता नागपूर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी चमु सुद्धा परिक्षा केंद्रावर उपस्थित होते. एकूण ३३२४७ उमेदवारांनी सदर परीक्षा दिली.

### पारदर्शक व ऑनलाईन पद्धतीने परिक्षा प्रक्रिया पूर्ण

परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी मनपाच्या वेबसाईवर प्रकाशित करणेचे पूर्वी उमेदवारांना माहिती करिता त्यांच्या उत्तरतालिका त्यांना कळविण्यांत आल्या तसेच उमेदवारांच्या लेखी परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारावर गुणवत्ता यादी तसेच प्रारुप निवड व प्रतिक्षा यादी उमेदवारांकरिता प्रकाशीत करण्यात आली. प्रारुप निवड व प्रतिक्षा यादीच्या अनुषंगाने संबधीत उमेदवारांना महानगरपालिकेच्या मुख्यालयात 08 जुलै ते 10 जुलै 2025 चे दरम्यान उमेदवारांचे मूळ दस्ताऐवज/प्रमाणपत्रे तपासण्यात आले. याअनुषंगाने उमेदवारांची अंतिम निवड व प्रतिक्षा यादी दि.30.07.2025 रोजी मनपा नागपूर चे अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात असून या प्रक्रियेमध्ये निवड यादीतील एकूण २४५ उमेदवारांपैकी 24 उमेदवार गैरहजर होते. तसेच एकूण 44 उमेदवार समांतर आरक्षण मध्ये त्यांचा समावेश असल्याने त्यांचे दस्ताऐवज तपासणी करीता संबंधीत विभागाला पाठविण्यात आले. संबंधीत विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर या उमेदवारांच्या नियुक्तीबाबत प्रक्रिया करण्यात येईल, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागातर्फे देण्यात आली. नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात सन 2004 नंतर शासनाद्वारे मान्य व अधिकृत बाह्य संस्थेमार्फत शासनाच्या दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्यांदाच एवढया मोठया प्रमाणात जाहिरातीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली. त्या बद्दल मा. आयुक्त, मनपा, यांनी या भरतीच्या अनुषंगाने कामे सोपविण्यांत आलेल्या अधिकारी/कर्मचा-यांचे अभिनंदन केले.

## बनावट ओळखपत्रावरील तीन शिक्षकांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

राज्यभर गाजत असलेल्या बनावट शालार्थ ओळखपत्र घोटाळा प्रकरणात सायबर शाखेनंतर आता विशेष तपास पथकानेही गुरुवारी बनावट शालार्थ ओळखपत्रावरून शिक्षक बनून पगार लाटणाऱ्या तीन शिक्षकांवर हंटर चालवला. यात दोन महिला सहाय्यक शिक्षिकांचा समावेश आहे.

या घोटाळा प्रकरणात सायबर शाखेने बुधवारी रोहिणी विठोबा कुंभार (माध्यमिक) आणि सिद्धेश्वर श्रीराम काळुसे (प्राथमिक) यांना पदाचा गैरवापर करीत राज्य सरकारची १०० कोटी रुपयांची फसवूणक केल्याचा ठपका ठेवत अटक केली. त्याच्या अवघ्या काही तासांतच विशेष तपास पथकाने गुरुवारी यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रेस तालुक्यातले सहाय्यक शिक्षक सतिश विजय पवार, नागपुरच्या दिघोरीतील आदर्श शाळेच्या सहाय्यक शिक्षिका भुमिका सोपान नखाते आणि म्हाळगी नगरातल्या विद्याभूषण शाळेच्या सहाय्यक शिक्षिका प्रज्ञा विरेंद्र मुळे या तिघांना अटक केली.

या तिघांनीही बनावट शालार्थ ओळखपत्राच्या आधारे नियुक्ती मिळवत वेतनापोटी २५ लाख रुपये लाटले. त्यामुळे राज्य शासनाची फसवणूक झाल्याच्या आशयाची तक्रार विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी रविंद्र पाटील यांनी दिली होती. त्या आधारे तपास पथकाने केलेल्या चौकशीत या तिघांनी बनावट शालार्थ ओळपत्राद्वारे नियुक्ती मिळविल्याचे सिद्ध झाले. फसवणूकीत स्पष्ट सहभाग आढळल्याने एसआयटीने गुरुवारी त्यांना अटक केली.

बनावट शालार्थ ओळखपत्र घोटाळा प्रकरणात विशेष तपास पथकासह सायबर शाखा समांतर तपास करीत आहे. या दोन्ही पथकांनी आतापर्यंत २६ जणांना अटक केली आहे. त्यापैकी एकट्या एसआयटीच्या ताब्यातील अटकेची संख्या आता १७ झाली आहे. यात ३ विभागीय शिक्षण उपसंचालक, ३ शिक्षणाधिकारी, ४ लिपीक, २ मुख्याध्यापक आणि २ शाळा संचालकांचा समावेश आहे. यात आता आणखी ३ शिक्षकांची भर पडली आहे. त्यामुळे अटकेतील आरोपींची संख्या आता २९ झाली आहे.

## फेसलेस प्रणालीचा गैरवापर करुन प्राप्त केलेले शिकाऊ अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स) रद्द

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

परिवहन विभागाद्वारे नागरीकांना वाहन विषयक तसेच अनुज्ञप्ती (ड्रायव्हिंग लासयन्स) विषयक विविध सेवा पुरविण्यात येतात यामध्ये नागरीकांच्या वेळेची बचत व्हावी व नागरीकांना आर.टी.ओ. कार्यालयात न येता घरबसल्या कामे व्हावीत यासाठी 38 प्रकारच्या सेवा फेसलेस पध्दतीने देण्यात येत आहेत. शिकावू अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स) ही सेवा देखील फेसलेस पध्दतीने उपलब्ध आहे.



परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करुन तसेच ऑनलाईन चाचणी देवून उत्तीर्ण होणा-या उमेदवारांना संगणकीय प्रणालीद्वारे लर्निंग लायसन्स देण्यात येते. यात कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप होत नाही व स्वयंचलीतरित्या ही प्रणाली कामकाज करते. ही सेवा आधार लिक मोबाईल क्रमांकावर ओ.टी.पी च्या माध्यमातुन कार्यान्वीत केली जाते. नागपूर परिवहन कार्यालयातील सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री ध्वज दखणे यांनी संगणकीय प्रणालीवर फेसलेस पध्दतीने लर्निंग लायसन्स काढलेल्या काही उमेदवारांशी भ्रमणध्वनी वर संभाषण करुन पडताळणी केली असता या उमेदवारांनी स्वतः परिक्षा न देता त्यांच्या भ्रमणध्वनीवर आलेला ओ.टी.पी बाहेरील व्यक्तीस देवून लायसन्स प्राप्त केल्याचे आढळून आले.

EKYC Faceless प्रणालीचा गैरवापर करुन तसेच भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायदा मधील तरतुदीचा भंग करुन व शासनाची फसवणूक करुन लर्निंग लायसन्स प्राप्त केल्यामुळे नागपूर शहरातील तीन व्यक्ती विरुद्ध सिताबर्डी पोलीस ठाणे येथे कार्यालयातर्फे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच तीनही व्यक्तीचे लर्निंग लायसन्स कार्यालयाद्वारे रद्द करण्यात आले आहे. तरी नागपूर शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की कोणीही ऑनलाईन फेसलेस प्रणालीचा गैरवापर करुन चाचणी न देता लायसन्स प्राप्त करण्याचा प्रयत्न करु नये. ही बाब रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने घातक आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते हीरक महोत्सवी समारंभाचे उद्घाटन आज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :



भारताचे सरन्यायाधीश (सीजेआय) भूषण गवई २ ऑगस्ट रोजी नागपूर येथील दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या हीरक महोत्सवी समारंभाला उपस्थित राहणार आहेत. महाविद्यालयाच्या आवारातील डॉ. आंबेडकर सभागृहात सकाळी १०.३० वाजता या समारंभाचे उद्घाटन होईल. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट उपस्थित राहणार आहेत. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई, आदरणीय अध्यात्मिक नेते समारंभाच्या अध्यक्षस्थानी असतील. हीरक महोत्सवी उत्सव हा महाविद्यालयाच्या समृद्ध वारशावर, समाजासाठी त्याचे महत्त्वपूर्ण योगदान आणि भविष्यासाठीचे त्यांचे दृष्टिकोन यावर चिंतन करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण प्रसंग असेल.



नागपूर : वाईल्ड लाईफ फोटोग्राफर लोकेश माटे यांच्या सौजन्याने वाघीण व तिच्या बछड्यांचे गोठणगाव उमरेड कराडला येथे टिपलेले छायाचित्र

## माजी मंत्री राऊत पुत्रास धक्का
### युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद मोरेंकडे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :



काँग्रेस क्षनेते माजी मंत्री व आमदार डॉ. नितीन राऊत यांचे पुत्र कुणाल राऊत यांना युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदापासून दूर करण्यात आले आहे. त्यांच्याऐवजी शिवराज मोरे यांना प्रदेशाध्यपदाची धुरा देण्यात आली आहे. कुणाल राऊत यांनी काही वादग्रस्त निर्णय घेतले होते. त्यामुळे युवक काँग्रेसमध्ये दुफळी निर्माण झाली होती.

राऊत यांनी युवक काँग्रेस कार्यकारिणीतील तब्बल ६० पदाधिकाऱ्यांना पदमुक्त केले होते. त्याविरोधात पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ दाद मागितली होती. त्यानंतर तो आदेश मागे घेण्यात आला होता. या घडामोडीनंतर युवक काँग्रेसच्या प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी शिवराज मोरे यांची नियुक्ती करून कुणाल राऊत यांच्या इशारा देण्यात आला होता. पक्ष संघटनेचे नियम डावलून एकाधिकारशाहीने काम करणाऱ्या युवक काँग्रेसच्या उपाध्यक्ष, सरचिटणीस, चिटणीस यासह विविध पदाधिकाऱ्यांना पदमुक्त करणाऱ्या महाराष्ट्र युवक काँग्रेस अध्यक्ष कुणाल राऊत यांना काँग्रेसच्या वरिष्ठ तसेच भारतीय युवक काँग्रेसच्या अध्यक्षांनी झटका देत उपाध्यक्ष असलेले शिवराज मोरे यांची प्रदेश संघटनेच्या कार्यकारी अध्यक्ष पदी नियुक्ती केली होती. आता त्यांना थेट प्रदेशाध्यक्ष करून कुणाल राऊत यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता. अलिकडे कुणाल राऊत यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीत स्थान देण्यात होते. तेव्हाच त्यांना पद जाणार असल्याचे सांगण्यात येत होते. आज विश्वजीत मोरे यांच्या नियुक्ती आदेश काढण्यात आले आहे.

दरम्यान, कुणाल राऊत पक्षशिस्त न पाळता संघटना चालवत असल्याच्या अनेक तक्रारी यापूर्वी देखील दिल्लीत पोहचल्या होत्या. अध्यक्ष म्हणून कुठलीही जबाबदारी पार न पाडता सक्रिय पदाधिकाऱ्यांना सूडबुद्धीने पदमुक्त करणाऱ्या राऊतांनाच पक्षाने कार्य अहवाल सादर करायला सांगितल्याचे ऐकिवात आहे. उपाध्यक्ष तन्वीर विद्रोही, सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार, केतन ठाकरे, अनुराग भोयर, मिथिलेश कन्हेरे, अक्षय हेटे, अभिषेक धवड यांच्यासारख्या पदमुक्त केलेल्या सर्व ६० पदाधिकाऱ्यांची दखल घेत मोठी चपराक अध्यक्ष कुणाल राऊत यांना भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चीब व राष्ट्रीय प्रभारी कृष्णा अल्लावरू यांनी दिली.

## एसएसबीने केला घरफोडीचा पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

व्यावसायिकाच्या कार्यालयाचे शटर उचकवून चोरी करणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा शाखा (एसएसबी) च्या पथकाने अटक केली. शेख सुलतान शेख मोहम्मद (23) रा. गोविंदगंज, उप्पलवाडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. फियार्दी अभय वैरागडे (58) रा. इंद्रनिल हाईट, रहाटे कॉलनी यांचे कामठी रोडवर सीपीएल कॉम्प्लेक्समध्ये स्पेअर्स पाट्र्सचे दुकान आहे. गत 23 जुलैच्या रात्री वैरागडे दुकान बंद करून घरी गेले होते. पहाटेच्या सुमारास अज्ञात आरोपीने कार्यालयाचे शटर मध्यभागातून उचकवत आत प्रवेश केला. काऊंटरच्या गल्ल्यात ठेवलेली 3 हजारांची रोकड आणि लॅपटॉप चोरी करून पसार झाला या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे सामाजिक सुरक्षा विभागही करीत होते. तपासादरम्यान या गुन्ह्यात सुलतानचा हात असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारावर सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

## शस्त्रासह फिरताना सापडला तडीपार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गस्तीदरम्यान एका तडीपार गुंडाला शस्त्र घेऊन फिरताना अटक केली. अक्षय किशोर मडावी (27) रा. न्यू फुटाळा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. अक्षयविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्याची लगाम कसण्यासाठी झोन 2 च्या डीसीपींनी मे महिन्यात त्याला एक वषार्साठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. बुधवारी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास युनिट 5 चे पथक अंबाझरी ठाण्यांतर्गत तेलंगखेडी परिसरात गस्त घालत होते.

या दरम्यान माफसूजवळ अक्षय संशयास्पदरित्या फिरताना दिसला. पोलिसांनी त्याला हटकले असता त्याने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला. अंबाझरी ठाण्यात नेऊन त्याचा अभिलेख काढला असता तो तडीपार असल्याची माहिती मिळाली. तो कोणतीही परवानगी न घेता शहरात दाखल झाला होता आणि काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशातून परिसरात शस्त्र घेऊन फिरत होता. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध तडीपारीचे उल्लंघन आणि आर्म्स ॲक्टसह गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास अंबाझरी पोलिस करीत आहेत.

## एक तारीख, एक तास एक साथ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

स्वच्छ, सुंदर नागपूर साकारण्यासाठी महिन्याच्या पहिल्याच दिवशी नागपूर महानगरपालिका व नागपूर स्मार्ट सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने व घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या एक तारीख, एक तास, एक साथ या अभिनव उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या नेतृत्वात दहाही झोनच्या सहाय्यक आयुक्त यांच्या मार्फत शुक्रवारी (ता.१) मनपाच्या दहाही झोनमध्ये आरोग्याच्या संदर्भात सहा मूलमंत्र यावर भर देणाऱ्या सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियान अंतर्गत एक तारीख, एक तास, एक साथ उपक्रम राबविण्यात आला. मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वचछता विभागामार्फत प्रत्येक झोनमध्ये स्वच्छता करण्यात आली. यात लक्ष्मीनगर झोनमधील प्रभाग क्रमांक ३८ मध्ये प्रगतीनगर, धरमपेठ झोनमधील प्रभाग क्रमांक १४ मधील डब्ल्यूसीएल रोड, भारत नगर, राजभवन, हनुमान नगर झोन मधील प्रभाग क्रमांक ३२ मधील दुर्गानगर शाळा, धंतोली झोन मधील प्रभाग क्रमांक १७ मधील भुरा मैदान हाजरी स्टॅंड, नेहरूनगर झोन मधील प्रभाग क्रमांक २८ मधील धनवंतरी नगर , गांधीबाग झोन मधील प्रभाग क्रमांक १८ मधील चंदनीपुरा, तरंजीपुरा झोन मधील प्रभाग क्रमांक २० मधील नाईक तलाव, महात्मा ज्योतीबा शाळेजवळ, लकडगंज झोन मधील प्रभाग क्रमांक ४ मधील भरतवाडा रोड, नेताजी नगर नागपूर स्कूलच्या जवळ, आशीनगर झोन मधील प्रभाग ७ मधील आवळे बाबू चौक, मंगळवारी झोन मधील प्रभाग १ मधील मंगळवारी बाजार मध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केली. यावेळी नागरिकांना पावसाळ्याच्या दृष्टीने विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. याशिवाय नागरिकांना हाताची स्वच्छता राखणे, घराची स्वच्छता राखणे, परिसर स्वच्छ ठेवणे, शौचालयाची स्वच्छता राखणे, नाल्या व सांडपाण्याची जागा स्वच्छ ठेवणे, तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता राहणार नाही, याची काळजी घेण्याच्या संदर्भात जनजागृत करण्यात आले.

## आपत्कालीन व ट्रॉमा केअरवर ईम्पॅक्टचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

भारतासारख्या देशात जिथे ईमरजन्सी मेडिसीन अजूनही विकसित होण्याच्या प्रक्रियेत आहे अशा वेळी ईमरजन्सी केअर सिस्टीम अधिक मजबूत करण्याकरिता आपत्कालीन वैद्यकीय सेवा व ट्रॉमा केअरवर आधारित ईम्पॅक्ट 2025 या शैक्षणिक परिषदेचे आयोजन किम्स किंन्सवे हॉस्पिटल 2 व 3 ऑगस्ट 2025 ला करीत आहे.



3 ऑगस्टला होणाऱ्या उद्घाटन सोहळ्याला माजी खासदार अजय संचेती व पोलिस उपायुक्त लोहित मतानी उपस्थित राहणार आहेत.अशी माहिती ईम्पॅक्ट 2025 चे आयोजन अध्यक्ष व किम्स किंन्सवे हॉस्पिटलचे इमर्जन्सी मेडिसिन व ट्रॉमाविभाग प्रमुख डॉ. रुपेश बोकडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारतासारख्या देशात रस्ते अपघात, काडीर्याक अरेस्ट, स्ट्रोक, विषबाधा आणि नैसर्गिक आपत्ती, यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला कमी वेळात प्राथमिक उपचार मिळावा या हेतूने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे इमर्जन्सी केअर सिस्टीम अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने या परिषदेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ञांचे व्याख्यान, हँड्स ऑन वर्कशॉप, सिमुलेशन सेशन्स, शोधनिबंध सादरीकरण, पॅनल डिस्कशन सत्र घेण्यात येणार आहेत. या परिषदेमध्ये देशभरातील आघाडीचे इमर्जन्सी मेडिसिन तज्ञ, ट्रॉमा सर्जन व क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट सहभागी होणार आहे.

इम्पॅक्ट 2025 मध्ये सहभागी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तज्ञांमध्ये इमर्जन्सी मेडिसिन चे प्रमुख, जे.पी.एन. अपेक्स ट्रॉमा सेंटर, ए.आय.आय. एम. एस. नवी दिल्लीचे संचालक तसेच डब्ल्यू.एच. ओ. कोलॅबोरेटिंग सेंटर फॉर इमर्जन्सी व ट्रॉमा केअर दक्षिण पूर्व आशिया क्षेत्राचे डॉ. संजीव भोई यांचा तसेच राष्ट्रीय संस्थांमधील तज्ञ व आघाडीचे क्रिटिकल केअर तज्ञ यांचा समावेश आहे. यावेळी पत्र परिषदेला किम्स किंग्सवे हॉस्पिटलचे युनिट हेड तुषार गावंडे उपस्थित होते.

# मौनी बाबा देवस्थान, गुजरखेडीसाठी ५ कोटी रुपयांची तरतूद

## आमदार डॉ. आशिष देशमुख यांचे रघवी समाजातर्फे आभार

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १ :

तालुक्यातील गुजरखेडी येथील रघवी समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या मौनी बाबा तपोभूमी देवस्थानाला प्रादेशिक पर्यटन विभागामार्फत ५ कोटी रुपये निधी नुकताच मंजूर करण्यात आला आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी रघवी समाजातर्फे आमदार डॉ. आशिष देशमुख यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.



मौनी बाबा तपोभूमी हे रघवी समाजासाठी एक महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक केंद्र आहे. नारळी पौर्णिमा, कार्तिक पौर्णिमा आणि होळी पौर्णिमा यासारख्या पवित्र दिवशी येथे समाजबांधव मोठ्या प्रमाणावर एकत्र येतात. या वेळी सामूहिक लग्ने, भजन, प्रवचन, एकत्रिक चौका आरती अशा विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. भंडाऱ्याचेही आयोजन होते.

या महत्त्वपूर्ण निधी मंजुरीनंतर, समस्त रघवी समाज, मौनी बाबा तपोभूमी देवस्थान कमिटी व कबीर पंथी बांधवांनी आमदार डॉ. आशिष देशमुख यांची भेट घेऊन आभार प्रदर्शन केले.

या वेळी परमपूज्य पंच हुजूर प्रकाश मुनी नाम साहेब नवोदित वंशाचार्य परमपूज्य उदित मुनी नाम साहेब माजी पंचायत समिती सदस्य व वाघोडा जिल्हा परिषद सर्कल प्रमुख तिलक कमाले मंडळ महासचिव पिंटेस महंत गुजरखेडी कमिटीचे अध्यक्ष बाबुरावजी लोलूसरे, उपाध्यक्ष विनोदजी महाजन माजी सचिव रमेश महंत, सहसचिव कुसुमदासजी महंत, अरविंदजी केसरे, दिलीप केसरे, माणिक देवजी धामदे प्रामुख्याने उपस्थित होते.

या निधीमुळे मौनी बाबा तपोभूमीचे सौंदर्यीकरण व सुविधा विकास साधला जाईल, तसेच समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना आणखी बळ मिळेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सत्रापुर येथे सुरु असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर कन्हान पोलिसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १ :

कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने सत्रापुर येथे सुरु असलेल्या अवैध जुगार अड्यावर धाड टाकुन पाच आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचा जवळुन ९२,०१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गुरुवार (दि.३१) जुलै रोजी पोलीस निरीक्षक वैजयंती मांडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस प्रोव्हीशन, जुगार रेड व अवैध धंध्यावर कारवाई करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली कि सत्रापुर लेबर कॅम्प येथे काही युवक खुल्या जागेवर ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लाऊन हार जीतचा जुगाराचा खेळ खेळीत आहे.

कन्हान पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता तिथे मोकळ्या मैदानावर काही युवक घोळक्यात गोलाकार बसून बावन ताशपत्तेचा एक्का बादशहाचा खेळ पैशाने लावून हारजीतचा खेळत असताना दिसून आले. पोलीसांनी स्टाफसह लपून छपून छापा टाकला असता तिथे जुगार खेळणारे पाच युवकांना रंगेहाथ पकडले व एक युवक पळून गेला कारवाईत पोलीसांनी जुगनू महादेव लोंडे (४८), अभय अशोक खडसे (४०), अजय बिजेश गायकवाड (३०), विजय गोवर्धन गायकवाड (३६) सतिश राजेश शेंडे (३५) सर्व रा.सत्रापुर कन्हान यांना ताब्यात घेऊन त्यांचा जवळुन तीन मोबाइल किंमत ९०,००० रुपए आणि रोख रक्कम २०१० असा एकुण ९२,०१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी कन्हान पोलीसांनी पाच आरोपी आणि फरार बल्लू उर्फ शरद शेषलाल पात्रे यांचा विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, हरिष सोनभद्रे, अमोल नागरे, मोहित झाडे, पवन भेंडरकर, सूरज कांबले, जिवन विघे, अश्विन गजभिए सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली .

# उमरेडच्या ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस आणि सोनोग्राफी सेवा आता मोफत

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. १ :

उमरेडच्या ग्रामीण रुग्णालयातील ट्रामा केअर सेंटरमध्ये नुकतेच डायलिसिस सेंटर सुरू करण्यात आले असून, ही सेवा स्थानिक रुग्णांसाठी मोठा दिलासा ठरत आहे. या केंद्रात एकाचवेळी पाच रुग्णांना डायलिसिस करता येणार असून, ही सुविधा शासनाच्या योजनेंतर्गत पूर्णतः मोफत देण्यात येणार आहे.



यापूर्वी डायलिसिस रुग्णांना उपचारासाठी नागपूरपर्यंत प्रवास करावा लागत होता. यामुळे वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढत असे. आता मात्र ही सुविधा उमरेडमध्येच उपलब्ध झाल्याने रुग्णांना आपल्या गावातच योग्य उपचार मिळणार आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गासाठी ही सेवा मोठा आधार ठरणार आहे.

यासोबतच, गरोदर मातांसाठीही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्रामीण रुग्णालयात डॉ. पराते यांच्या मार्गदर्शनाखालील सोनोग्राफी सेंटरमध्ये विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून मोफत सोनोग्राफी तपासणी केली जाणार आहे. ही सेवा देखील गरजू महिलांसाठी उपयुक्त ठरणार असून, नियमित गरोदर तपासणीसाठी आता इतर ठिकाणी जाण्याची गरज उरणार नाही. उमरेड परिसरातील नागरिकांनी या नव्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## प्रेमचंद आणि मोहम्मद रफी यांना भावपूर्ण श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १ :

साई इंटरनॅशनल स्कूल, परसोडा, रामटेकचे विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी दोन महान व्यक्तींना, मुन्शी प्रेमचंद, दिग्गज हिंदी लेखक आणि दिग्गज गायक मोहम्मद रफी यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली. विद्यार्थ्यांनी भाषणे केली आणि हिंदीतील दिग्गज मुन्शी प्रेमचंद आणि मोहम्मद रफी यांच्या महान योगदानावर प्रकाश टाकला. त्यांनी पोस्टर्स आणि तक्तेही तयार केले. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी सभेला संबोधित केले. विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते म्हणाले की, अशा महान व्यक्तींचे स्मरण करण्याची वेळ आली आहे.

# सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक देवीदास लांबट यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १ :

महात्मा गांधी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, वानाडोंगरी क्रीडाशिक्षक देविदास लांबट यांचा सेवानिवृत्तीनिमीत्त दत्ता मेघे ऑडिटोरियम वानाडोंगरी येथे सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य मधुकर झलके होते. तर माजी प्राचार्य राजेंद्र महाजन, माजी प्राचार्य देवाजी भुजाडे, प्राचार्य प्रशांत तामसेटवार, ज्ञानेश्वर मते, माजी नगरसेवक गुणवंत मते, बाळू मोरे, वानाडोंगरीचे माजी सरपंच सतिश शहाकार, सेवानिवृत्त शिक्षक प्रदिप तिनकर, शिवनायक पांडे, सत्कारमूर्ती देविदास लांबट व रत्नाताई लांबट उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांनी सत्कारमूर्तीच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकला. सर्वप्रथम लांबट सरांचा सपत्नीक शाळेच्या वतीने भावपुर्ण सत्कार करण्यात आला. शाळेच्या विद्यार्थिनी तसेच ज्येष्ठ शिक्षिका सीमा सातपुते, मेघा नारनवरे, व प्रा. आनंद नकाते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पीपीटी सादरीकरण करुन सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक यांनी नोकरी दरम्यान केलेल्या कार्याचा आढावा सादर करण्यात आला. तसेच देविदास लांबट सरांनी आपले मनोगत व्यक्त केले. आतापर्यंत मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. प्रास्तविक प्राचार्य प्रशांत तामसेटवार तर संचालन सोनाली चामाटे व आभार शुभांगी हिवरे यांनी मानले. कार्यक्रमांमध्ये महात्मा गांधी हायस्कूल तसेच ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक सहभागी होते.

# स्नेहा फाउंडेशनतर्फे प्रागतिक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

महादूलाकोराडी स्थित स्नेहा फाउंडेशन या एन.जी.ओ.मार्फत प्रागतिक विद्यालय यांचे प्रांगणात गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश चे निःशुल्क वितरण महादूला नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी यांचे शुभ हस्ते करण्यात आले.



यावेळी मंचावर प्रागतिक अध्यापक शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष वसंत गाडगे, सचिव प्रकाश कुंभलकर, प्रागतिक प्राथमिक शाळाचे मुख्याध्यापक उमेश वानखेडे, माध्यमिकचे मुख्याध्यापिका विद्या संम रीत, प्रागतिक कॉन्व्हेन्टचे मुख्याध्यापिका अलका भांदक कर, तसेच भारतीय जनता पक्षाचे महादुला, अध्यक्ष प्रीतम लोहसारवा, कोराडी सरपंच नरेंद्र धनुले, सामाजिक जेष्ठ कार्यकर्ते राम तोडवाल,बी. जे. पी अध्यापक आघाडीचे लोकेश वरहोकर, स्नेहा फाउंडेशनचे राज मछले, यांनी प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक टेकाडे मॅडम तर सूत्रसंचालन विजय घिरडे सर यांनी केले. अल्पावधीतच अतिशय स्तुत्य उपक्रम स्नेहा फाउंडेशन राबवित आहे. याबाबत राजेश रंगारी यांनी त्याचे मनभरून कौतुक केले. संस्थेतर्फे प्रकाश कुंभलकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## बाबा सावजीवर ५ दिवसांसाठी कुलूप

**नागपूर :** हिंगणा टी-पॉइंटजवळील बाबा सावजी भोजनालयावर पुन्हा एकदा पोलिसांनी धाड टाकली. यावेळी तेथे ग्राहक मद्यप्राशन करताना आढळले. हॉटेल व्यवस्थापनाकडून त्यांना तेथे दारू पिण्याची सुविधा उपलब्ध केली जात होती. विशेष म्हणजे पोलिसांनी गत वर्षी जून आणि सप्टेंबर महिन्यातही येथे धाड टाकली होती. मात्र संचालकांनी याला गंभीरतेने घेत नव्हते. त्यामुळे डीसीपी ऋषिकेश रेड्डी यांनी भोजनालयाला 5 दिवसांसाठी कुलूप ठोकले आहे. भोजनालयाचा संचालक लक्ष्मण पौनिकरविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. बाबा सावजीमध्ये ग्राहकांना दारू पिण्याची सुविधा उपलब्ध केली जात असल्याची माहिती बुधवारी रात्री पोलिस उपायुक्त रेड्डी यांना मिळाली होती. यापूवीर्ही काही सामाजिक संघटना आणि स्थानिक नागरिकांनी भोजनालयात दारू उपलब्ध केल्या जात असल्याची तक्रार पोलिसांकडे केली होती. या माहितीवरून डीसीपी रेड्डी यांनी त्यांच्या पथकाला तेथे धाड टाकण्याचे आदेश दिले. रात्री 11 वाजताच्या सुमारास पोलिसांनी भोजनालयावर धाड टाकली. यावेळी ग्राहक टेबलवर बसून मद्यप्राशन करताना दिसले. हॉटेल व्यवस्थापनाकडून त्यांना खाद्य पदार्थही उपलब्ध केले जात होते. संचालक विजय पौनिकरविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

# रन फार नेचर स्पर्धेत २६० धावपटू धावले



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १ :

पेंच व्याघ्र प्रकल्प अंतर्गत सिल्लारी गेटजवळील अमलतास पर्यटन संकुल परिसरात मंगळवारी (ता. २९) जागतिक व्याघ्र दिनानिमित्त 'रन फॉर नेचर-२०२५' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश व्याघ्र संवर्धनासह जैवविविधतेचे रक्षण आणि स्थानिक सहभाग वाढवणे हा होता.

धनेश फाउंडेशन, देवलापार आणि पेंच व्याघ्र संवर्धन फाउंडेशन नागपूरच्या संयुक्त सहकायनि या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भर पावसात सुरू झालेल्या या निसर्गरम्य धावण्याच्या स्पर्धेत बफर गावातील युवक-युवतींपासून ते शहरातील निसर्गप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. एकूण २६० धावपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रसंचालक ए. श्रीलक्ष्मी (भा.व.से.) होत्या. उपसंचालक अक्षय गजभिये (भा.व.से.) यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली. स्मित गुप्ता यांनी सहप्रायोजक म्हणून मोलाचे सहकार्य केले. विजेत्यांना रोख पारितोषिके, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देण्यात आले. बफर विभागातील पुरुष व महिला गटासाठी अनुक्रमे १०,००० रुपये, ५,००० रुपए व तीन हजार रूपयांची पारितोषिके देण्यात आली, तर खुल्या गटासाठी १०,००० चे प्रथम बक्षीस देण्यात आले. सर्व सहभागी धावपटूंना प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. सोनल मते, विभागीय वनाधिकारी, शांताताई कुमरे, माजी जिल्हा परिषद सदस्या, अजिंक्य भटकर, मानद वन्यजीव रक्षक, संदीप भारती व पूजा लिंबगांवकर, सहाय्यक वनसंरक्षक, चंद्रकांत कोडवते व संजय नेवारे, पंचायत समिती सभापती तसेच पेंच प्रकल्पातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी उपस्थित होते.

## लेखन स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त सामाजिक शास्त्र विभागातर्फे निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अर्चना कहाळे पत्की होत्या.

# मोहपा (देवबर्डी) येथे स्वामीदर्शन मंडळाचे वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १ :

श्रीक्षेत्र देवबर्डी येथे स्वामीदर्शन महानुभाव मंडळ नागपूर द्वारा आयोजित वृक्षारोपण व वृक्षदिंडी कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आचार्य प्रवर महंत वाकीकर बाबा होते. श्रीदत्त मंदिर व महानुभाव आश्रम देवबर्डी येथील परिसरात टाळ, मृदंगाच्या तालात व ईश्वर नामाच्या गजरात वृक्षदिंडी काढण्यात आली. मंडळाच्या सदस्यांनी परिसरात विविध वृक्षांची रोपटे व फुलझाडांची लागवड केली. निसगार्ला जपणं म्हणजे परमेश्वरा प्रती व प्रकृती प्रती कृतज्ञता व्यक्त करनं. निसर्ग संवर्धन व वृक्ष संगोपन हे जीवन मूल्यांचा एक भाग असायला हवे असे प्रतिपादन आचार्य प्रवर महंत वाकीकर बाबा आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केले.




याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्षा शोभा कउटकर, राष्ट्रीय कीर्तनकार सचिन काळे,मोहगावचे सरपंच आशितोष तभाने, म्हसेपठारच्या सरपंच प्रिया कुबडे, मांडवीचे शरद जूनघरे, उध्दवदादा वाकीकर, स्वामीदर्शन मंडळाचे अध्यक्ष मनोज बोरकर, वजन व मापे अधिकारी तेजेंद्र गजभिये, सुनिल फरकाडे, रमेश सिरस्कर, नलु श्रीखंडे, दिवाकर कौथकर, विष्णू पोतले, डॉ खुशाल देशभ्रतार यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी नगरसेवक पिंटू झलके यांनी वृक्षांची रोपटे उपलब्ध करून दिली.

याप्रसंगी उपाध्यक्ष यशोदा निमगडे, ताम्रध्वज खोब्रागडे, छाया कलासुवा, राहुल शेंडे यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. मंडळाच्या सर्व महिला सदस्यांनी "आज आनंदी आनंद झाला.." या गीताच्या तालावर फेर धरला व कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष मनोज बोरकर यांनी केले.

संचालन कल्याणदादा वाकीकर, उद्धवदादा वाकीकर यांनी तर आभार श्रद्धा चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे कोषाध्यक्ष भूपेश शेंडे, चेतन मेश्राम, अशोक पवार, स्नेहल गजभिये, पुष्पा मोटघरे, राजेंद्र डोंगरे, रेषेंद्र उके, अर्चना बारमाटे, प्रिया शेंडे, प्राजक मेश्राम, घनश्याम मेश्राम आदींनी सहकार्य केले.

## विद्यार्थ्यांमध्ये वाघ व पर्यावरण जनजागृती

**नागपूर :** सातपुडा फाउंडेशन आणि हडस प्रायमरी व हायस्कूल (इंग्लिश मिडियम) यांच्या संयुक्त विद्यमाने ग्लोबल टायगर डे निमित्त चित्रकला, रंगभरो आणि टायगर मास्क स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. स्पर्धेत १ली ते १० वीच्या सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.१ ली ते ३ रीच्या विद्यार्थ्यांनी वाघाच्या छायाचित्रात रंग भरले, तर ४थी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी टायगर मास्क, पोस्टर्स आणि चित्रं साकारली. कार्यक्रमासाठी सातपुडा फाउंडेशनचे उपसंचालक. मंदार पिंगळे, बंडूभाऊ उईके, व मुख्याध्यापिकामृणाल कासखेडीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# कोराडी-महादूला ते घोघली रोड वरील दातपाड्या नाल्यावरील जीर्ण पुलाचे बांधकाम करावे

## महानुभाव नगर मधील नागरिकांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

घोगली, कोराडी, महादूला या गावाला जोडणारा दातपाड्या नाल्यावरील पुल अतिशय जीर्ण, झाला असून त्याचे नविनिकरण अतिजलद करावे अशी मागणी महानुभाव नगरवासी यांनी केली आहे.

रेड्रेसर कमिटी तर्फे चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री, तहसीलदार दहाट नागपूर ग्रामीण, पंचायत समिती बिडीओ तसेच मंत्रींमार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग, जिला परिषद बांधकाम या सर्व विभागाला प्रत रवाना झाली आहे सोबतच या नाल्याला पावसाळ्यात मोठ्याप्रमाणात पुर आल्याने आजूबाजूला पुराचे पाणी परिसरात शिरते त्यामुळे नागरिकांना येण्याजण्यास प्रचंड त्रास सहन करावा लागतो, पावसाळा सुरू असल्याने जरी संबंधित विभाग काम करत नसले तरी सदर समस्येबाबत महानिर्मिती कंपनी कोराडी, यांना देखील सी. एस.आर. मध्ये निधीची मागणी व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी व्यवस्थापक/मुख्य व्यवस्थापकीय संचालक स्वतंत्र विश्वास पाठक यांचेकडे देखील या पुलाची डागडुजी करावी. यासंदर्भात मीटिंग सन २०२४ मध्ये लोकप्रतिनिधी ग्रामपंचायत सदस्य अपर्णा गाडेकर यांनी स्वतः मीटिंग समक्ष म्हणणे मांडले होते हे विशेष आणि पाठक साहेब सह तत्कालीन मानद सचिव संदीप जोशी, मुख्यमंत्री पी एस आणि महानिर्मितीचे सगळे बडे अधिकारी यांनी त्यांना आश्वस्त केले होते की, जसा नवीन २/६६० महानिर्मिती प्रकल्प कोराडाला सुरू होईल तसेच घोघली पुलाचे नविनिकरणास निधी दिला जाईल, प्रकल्प मंजुरी आल्याने येथील नागरिक शासनाकडे मोठ्या आशेने बघत आहेत.

हा जीर्ण पुल कधी उध्वस्त होईल याचे काही खरे नाही. पुलाचे अतिशय जुनाट बांधकाम आहे. सन १९९८ मध्ये बांधल्यानंतर सां. बा. विभाग असो की जिल्हा परिषद बांधकाम यांनी या महत्वपूर्ण विषयाकडे लक्ष दिले नाही. तसेच या पुलाचे सिमेंट गळून लोखंडी गज दिसू लागले आहेत. शिवाय येथूनच वितभट्टेमालकांची हेवी लॉडेडट्रॅक या पुलावरून वाहतूक करतात, शाळकरी मुली, कास्तकरवर्ग, नोकरदार वर्ग देखील येथूनच वाहतूक होते.

वाहतूक देखील सतत सुरू असते कधीही केव्हाही अप्रिय घटना घडू शकते आणि असे झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभाग घेईल काय? असा सवाल येथिल महानुभाव नगर रीद्रेसर कमिटी चे अध्यक्ष मिलिंद गाडेकर, सचिव नरेश कुहिटे, उपाध्यक्ष संजय बावनकर, सहसचिव योगेश मेश्राम, सल्लागार आसट कर , सिद्धार्थ गजभिये, शरद मिरे, लीलाधर गौतम, लक्ष्मण उराडे, घोडके , जगन्नाथ पोपटे, क्षीरसागर दामुजी, नम्मु साहू, बाल्या मदामे, डॉक्टर ध्यानेशवर हिरणखेडे, पन्नालाल दमाहे, माधव वणकर, संकेत गोंडाने,कविता पाटोळे आधी ग्रामवाशियांनी केली आहे.

# अश्विन बैस यांची नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस अध्यक्षपदी निवड

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १ :

काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेत, वाडी येथील अश्विन बैस यांची नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही निवड काँग्रेस नेते राहुल गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, संघटन महासचिव के. सी. वेणुगोपाल, महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार करण्यात आली. अश्विन बैस यांनी माजी मंत्री सुनील केदार, खासदार श्यामकुमार बर्वे व इतर वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. "मी एक सामान्य कार्यकर्ता असून, माझ्यावर पक्षाने जो विश्वास



दाखवला त्यासाठी मी कृतज्ञ आहे. विशेषतः सुनील केदार साहेबांनी मला ही जबाबदारी दिली, त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे," असे बैस यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, "काँग्रेस पक्षाचे विचार गावागावात, घरोघरी पोहचवण्यासाठी मी नव्या जोशाने काम करणार असून युवकांना सोबत घेऊन, ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना मजबूत करण्याचे ध्येय ठेवले आहे. अश्विन बैस यांची निवड जिल्हा ग्रामीण काँग्रेसच्या कार्याला नवीन दिशा देईल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त केला जात आहे.अश्विन बैस यांचे वाडी शहर अध्यक्ष शैलेश थोराने, माजी न.प. उपाध्यक्ष राजेश थोराने तसेच नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीने अभिनंदन केले.

# आदिनाथ गुरु माऊली सेवाश्रमात नागदेवता पूजन



■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. १ :

जवळच्या बरबडी येथील राष्ट्रीय महामार्गावरील आदिनाथ गुरु माऊली सेवाश्रमात दरवर्षीप्रमाणे यंदाही नागपंचमी निमीत्य नागदेवतेचे उत्साहात पूजन करण्यात आले. यावेळी सेवाश्रमाचे संस्थापक ब्रह्ममूर्ती शेषानंद पांडे महाराज यांच्या शुभहस्ते नाग प्रतिमेचे पंचामृताने दुग्ध अभिषेक करण्यात आला. परीसरातील असंख्य भाविकांनी नागदेवतेच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. आश्रमचे कोषाध्यक्ष प्रकाशजी घवगवे, सिंदी श्रीकृष्ण कामनकर, रविन्द्रजी गाडगे, भगत टेकाम, गुरूआई मंदाताई पांडे ,सुक्ष्मा गाडगे, घवगवे, सुदरबाई निमसडे, रामप्यारी चंदेल, विवेक नान्हे, जनार्दन सुरकार, कमलाबाई भेन्डे,सुमन वांदिले पुजाराम खिरटकर, जसापुरचे समाजसेवक जनार्दन सुरकार वडगाव येथील हभप लिलाधर शिंदेकर उपस्थित होते.

# पारदर्शकता आणि लोकाभिमुखता यासह जनतेच्या कामांना प्राथमिकता : जिल्हाधिकारी डॉ. इटनकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

सर्व सामान्यांची महसूल विभागाशी निगडीत असलेली कामे तत्परतेने मार्गी लागावीत, महसूल विभाग अधिक लोकाभिमुख व्हावा, शासकीय कामकाजातील पारदर्शकता आणि निर्णय तत्परता प्रत्येकाला प्रत्ययास यावी यासाठी महसूल विभागातर्फे विविध उपक्रम राबविले जात आहेत. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यांच्या मार्गदर्शनाखाली या विविध उपक्रमासह महसूल दिन व महसूल सप्ताहानिमित्त जिल्ह्यातील प्रत्येक गावपातळीवर नागरीकांच्या महसूल विभागाशी असलेल्या शंकाचे समाधान करु असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.



दिनांक 1 ते 7 ऑगस्ट या कालावधीत शासनातर्फे लोकाभिमुख पद्धतीने साजऱ्या होणाऱ्या महसूल सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या पत्रकार परिषदेस अपर आयुक्त तेजूसिंग पवार अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महीरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे उपस्थित होते.

महसूल मंत्री तथा पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते 1 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजता नियोजन भवन येथे महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. महसूल संवर्गातील कार्यरत/ सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी, उत्कृष्ट संवाद अधिकारी / कर्मचारी पुरस्काराचे या समारंभात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते वितरण केले जाणार आहे. याच बरोबर शासकीय योजनांच्या विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण केले जाईल. 2 ऑगस्ट शासकीय जागेवर सन 2011 पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम होणार आहे.

ऑगस्ट रोजी पाणंद/ शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे, 4 ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे, 5 ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप, 6 ऑगस्ट रोजी शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेणे, 7 ऑगस्ट रोजी ट-रंल्लाि धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ होणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उदघाटन समारंभादरम्यान गेल्या वर्षभरात उत्कृष्ट कार्य केलेल्या महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. ई ऑफिसविषयीची माहिती तसेच पुढील एका वर्षाचे व्हिजनही यावेळी ठरविण्यात येणार आहे. महसूल विभाग हा राज्य शासनाचा अत्यंत महत्वपूर्ण विभाग आहे. या विभागाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना घेता यावा, जागरूकता वाढावी, शासनाबद्दलचा नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम या सप्ताहादरम्यान राबविण्यात येणार आहेत. विविध प्रलंबित विषय निकाली काढण्याचा प्रयत्न राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते
## लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या पुतळयाला माल्यार्पण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

महाराष्ट्रात वैचारिक परिवर्तन घडविणारे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 105 व्या जयंती निमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दीक्षाभूमी चौकातील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, आमदार मोहन मते, आमदार अभिजीत वंजारी, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार संदीप जोशी, राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग (सतीश) डागोर, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, मायाताई इवनाते, माजी सत्तापक्ष नेता संदीप जाधव सहायक आयुक्त सतीश चौधरी, कार्यकारी अभियंता रवींद्र बुंधाडे, उपस्थित होते.

नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयाला माल्यार्पण करून अभिवादन केले.



यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कायार्तून समजाला दाखविलेल्या वंचितांच्या विकासाच्या मार्गावर राज्य शासन मार्गक्रमण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या गीतांनी ज्वलंत ठेवले आणि वंचितांचा आवाज समाजामध्ये पोहोचवण्याचे महत्वपूर्ण कार्य केले .पृथ्वी ही शेषनागाच्या डोक्यावर नाही तर कामगाराच्या तळहातावर उभी असल्याची मांडणी त्यांनी आपल्या साहित्यातून केली. त्यांनी दाखवविलेल्या वंचितांच्या विकासाच्या मार्गावर चालण्याचा राज्य शासन प्रयत्न करेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी गिरीश पांडव, सर्वश्री. सुभाष पारधी, दिलीप हाथीबेड, सतीश सिरसवन, विमल कुमार श्रीवास्तव, राजेश हाथीबेड, सागर जाधव, भैयाजी विधाने, शंकरराव वानखेडे, विष्णू चहांदे, नरेश बरडे, दिलीप खैरकर, विवेक निकोसे, अजय साहू, श्रीमती उषा पॅलट, . किशोर बेहाडे, माधव वाघमारे, विजय डोंगरे, विलास पायघन, रवी वानखेडे, रवींद्र खडसे, राजू साळवे, मुरलीधर रनखाम, गणेश साळवे, दुर्गेश बावणे, सचिन इंगोले यांच्यासह साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सामाजिक संस्थाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# महिला मंडळांकडून भजन सादर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

श्रावण मासातील पहिल्या सोमवारनिमित्त कामठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर, दरजीपुरा दाळ ओली क्रमांक २ येथे नागपूर छत्री समाज महिला भजन मंडळ व कामठी महिला भजन मंडळ यांनी सुरेल भजन सादर केले. नागपूर महिला भजन मंडळाकडून कलावती डोमकुडवार, सरस्वती सोमवार, सरला कटारपवार, लक्ष्मी सिग्गेनवार, सकुन कटारपवार, चंद्रकला कल्लमवार, कामठी छत्री समाज महिला भजन मंडळाकडून शोभा कैरवार, सरस्वती तालेवार, गीता मंथनवार, ममता पोळकमवार, माया बरिया, दुर्गा कायरवार यांनी भजन समुहात भाग घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यास कमल नामपल्लीवार, संजय गटलेवार, नरेंद्रमूर्ती कायवार, राजू पोलकमवार, नरसिंग कलामवार, रमेश कल्लमवार, जगदीश अडपेवार आदिंनी सहकार्य केले.

# भाजी विक्रेता महिलेला लुटणारे गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

ठाण्यांतर्गत एका भाजी विक्रेता महिलेची दिवसभराची कमाई लुटून फरार झालेल्या दोघांना प्रतापनगर पोलिसांनी अटक केली. सागर नरेंद्र तिवारी (21) रा. प्रभूनगर, जयताळा आणि पवन महेंद्र तिवारी (19) रा. संघर्षनगर, जयताळा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फिर्यादी नवीनादेवी परमानंद वर्मा (50) ही महिला उदरनिवार्हासाठी भाजी विक्रीचा व्यवसाय करते. जयताळाच्या बाजार चौकात ती भाजीचा ठेला लावते आणि रात्रीला तेथेच झोपते. गत 22 जुलै रोजी नेहमीप्रमाणे रात्री 11 वाजताच्या सुमारास नवीना यांनी दुकान बंद केले. दिवसभराच्या भाजी विक्रीतून मिळालेले 7 हजार रुपये एका पिशवीत ठेवले आणि पिशवी उशीखाली ठेवून रात्रीला झोपी गेल्या. रात्री 11.30 वाजताच्या सुमारास काही आवाज झाल्याने त्यांची झोप उघडली. त्यांनी उठून पाहिले असता दोनजण पळताना दिसले.

त्यांनी उशीखाली ठेवलेली पिशवी तपासली असता ती तेथे नव्हती. दोन्ही आरोपी त्यांची पिशवी चोरी करून पळाले होते. नवीना यांच्या तक्रारीवरून प्रतापनगर पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

## मनपातर्फे सुप्त गुणांना वाव देण्यासाठी
# दिव्यांग ऑर्केस्ट्राचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

शहरातील दिव्यांग व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्यातील कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी नागपूर महानगरपालिका अमृत महोत्सव वर्षानिमित्त लवकरच दिव्यांग ऑर्केस्ट्रा समारंभाचे आयोजन करणार आहे. या उपक्रमासंदर्भात मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक घेतली आणि या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आवश्यक निर्देश दिले. या बैठकीला उपायुक्त रंजना लाडे, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, दिव्यांग समन्वयक अभिजीत राऊत, क्रीडा निरीक्षक सौ. उज्वला चरडे यांच्यासह मनपाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. ऑर्केस्ट्रा समारंभात शहरातील इच्छुक दिव्यांग विद्यार्थी तसेच शाळाबाह्य दिव्यांग व्यक्तीही सहभागी होऊ शकतात. जास्तीत जास्त दिव्यांगांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी केले आहे. सहभागी होणाऱ्या इच्छुक दिव्यांगांना ऑर्केस्ट्रा समारंभात प्रभावी सादरीकरण करता यावे. यासाठी महानगरपालिकेतर्फे २ महिन्यांचे निः शुल्क प्रशिक्षण दिले जाईल. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक व्यक्तींनी मनपाच्या अधिकृत संकेतस्थळ वर उपलब्ध असलेला अर्ज भरून आपला सहभाग नोंदवावा.

# पब्लिको कॅफेवर पोलिसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

परिमंडळ क्र. 2 चे पोलिस उपायुक्त नित्यानंद झा यांच्या पथकाने अंबाझरी ठाण्यांतर्गत कॅम्पस चौकाजवळील पब्लिको कॅफेवर धाड टाकली. यावेळी ग्राहक हुक्क्याचे सेवन करताना पोलिसांना आढळले. पोलिसांनी कॅफे संचालक विकास राजू डागोर (32) रा. रामनगर आणि कुवेश रोशन शर्मा (19) रा. हिलटॉपविरुद्ध कोटपा ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

पब्लिको कॅफेमध्ये हुक्का पार्लर चालत असल्याची माहिती उपायुक्त झा यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर झा यांनी आपल्या पथकाला तेथे धाड टाकण्याचे आदेश दिले. त्यानुसार बुधवारी रात्री पोलिसांनी कॅफेवर धाड टाकली.

वरील आरोपी ग्राहकांना हुक्काचे साहित्य उपलब्ध करताना आढळले. पोलिसांनी कॅफेतून 2700 रुपये किंमतीचे साहित्य जप्त करून गुन्हा नोंदविला आहे. ही कारवाई सपोनि संतोष कदम, पोउपनि साकोरे, पोहवा राजेश सोनवणे, महेश बावणे, नंदकिशोर देवगडे, जयंता नादेकर आणि मोनू सय्यद यांनी केली.

# बेपत्ता मख्खनसिंग बावरीचा मृतदेह आढळला

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १ :



विकासनगर, कोंढाळी येथील मख्खनसिंग रणजितसिंग बावरी (वय ३३) यांचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ३० जुलैच्या रात्री औषध आणायला गेलेले बावरी घरी परतले नाहीत. पत्नी लक्ष्मीकौर बावरी यांनी पती बेपत्ता झाल्याची तक्रार ३१ जुलै रोजी कोंढाळी पोलीस ठाण्यात नोंदविली होती.

लक्ष्मीकौर यांनी पोलिसांना सांगितले की, त्यांचे लग्न २००७ साली मख्खनसिंग बावरी यांच्याशी झाले असून त्यांना एक मुलगा आहे. मख्खनसिंग शेतीमाल खरेदी-विक्री व मजुरीचे काम करीत होते. ३० जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता दोघेही बाजारात गेले होते. सायंकाळी ६ वाजता घरी परतल्यानंतर मख्खनसिंग यांनी "मी औषध घेऊन येतो" असे सांगत दुचाकीवरून बाहेर पडले. रात्री ८ वाजेपर्यंत ते घरी परतले नाहीत, म्हणून लक्ष्मीकौर यांनी त्यांच्या मोबाईलवर (९८७५१-६१४१३) फोन केला असता, "मी मेडिकल स्टोअरवर आहे, लगेच घरी येतो" असे सांगितले. त्यानंतर मोबाईल बंद झाला. रात्रभर शोध घेतल्यानंतरही मख्खनसिंग घरी न परतल्याने कुटुंबीयांनी नातेवाईकांसह परिसरात शोध घेतला. मात्र काहीच माहिती मिळाली नाही, म्हणून मख्खनसिंग बावरीच्या पत्नीने मख्खनसिंग बावरी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. तक्रार मिळताच कोंढाळी पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागपूर ग्रामीण अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल मस्के उप विभागीय पोलिस अधिकारी बापू साहेब-रोहोम यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढाळी ठाणेदार राजकुमार त्रिपाठी व गुन्हे अन्वेषण पथक तपासात गुंतले. तपासादरम्यान 01 ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजताचे सुमारास कोंढाळीपासून अवघ्या 02 किमी अंतरावर वर्धा रोडवरील शिरमी शिवारात मख्खनसिंग बावरी यांचा रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह सापडला. पंचनामा करून मृतदेह नागपूर येथील शासकीय रुग्णालयात (जीएमसी) शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. तपासात उघड झाले की, 30 जुलै रोजी दुपारी 12-30 वाजता मख्खनसिंग एका महिले बरोबर वर्धा जिल्ह्यातील कारंजा (घा.) येथील सोनाराच्या दुकानातून बाहेर पडताना दिसले होते. त्याच दिवशी रात्री ८.३० वाजता कोंढाळी-वर्धा टी पॉइंटवर ते दोन व्यक्तींसह वर्धा रोडकडे जाताना दिसले. त्यानंतर त्यांचा मोबाईल बंद झाला.

# इंदोरा मेट्रो स्थानकात बेवारस कुत्र्यांचे वास्तव्य



*इंदोरा मेट्रो स्थानकात बिनधास्तपणे विसावलेली बेवारस कुत्रे*

प्रमोद जांभुळकर
नागपूर, दि. १

प्रभाग ७ मधील इंदोरा मेट्रो स्थानकात बेवारस कुत्रे वास्तव्यात असल्याने प्रवाशांची डोकेदुखी वाढली आहे. संबंधीत अधिकाऱ्यांकडे तक्रार करून सुद्धा ही समस्या दूर होत नसल्याने प्रवाशी संताप व्यक्त करीत आहेत.

दिवसभर हे बेवारस कुत्रे मेट्रो स्थानकात फिरत असतात. मेट्रोने प्रवास करणारे प्रवासी स्थानकात येतात त्यावेळी हे कुत्रे प्रवाशांच्या जवळ येतात. प्रवाशांना पाहून कुत्री भुंकत असतात तर, काही कुत्री प्रवाशांच्या अंगाला चाटत असतात. त्यामुळे लहान मुले, महिला आणि वृद्ध भयभित झाले आहेत.

मेट्रो स्थानकात गेल्यावर कुत्रे पाहून भिती वाटते. चावणार तर नाही ना अशी भिती असते. त्यामुळे प्रवासी मेट्रोने प्रवास करण्याऐवजी ऑटोने प्रवास करतात असे प्रिती वासनिक यांनी सांगितले.

बेवारस कुत्रे मेट्रो स्थानक परिसरात फिरत असतात. तेथेच घाण करतात. आरोग्याच्या दृष्टीने हे घातक आहे असे प्रतिभा सहारे यांनी सांगितले.

प्रवास करण्याच्या घाईत प्रवासी असतात. मेट्रो गाठण्यासाठी प्रवाशांना धावपळ करावी लागते. अशा वेळी कुत्रे प्रवाशांच्या मागे धावतात. कुत्र्यांच्या भितीपोटी प्रवाशांना थांबावे लागते. त्यात त्यांची मेट्रो निघून जाते असे स्नेहल राऊत यांनी सांगितले. स्थानकाची स्वच्छता आणि सुरक्षेच्या दृष्टीकोनातून महा मेट्रोने योग्य पावले उचलावी. त्याचप्रमाणे मेट्रो परिसर कुत्रेमुक्त करण्यासाठी आणि प्रवाशांना सुरक्षितपणे प्रवास करण्यासाठी मेट्रोने उपाययोजना करावी अशी मागणी पोर्णिमा धाबर्डे, नेहा सोनेकर, प्रणव जांभुळकर, दिव्यांश साखरे, संदीप चौधरी यांनी केली आहे.

## महासागर प्रभाग वार्ता

# म्हाळगीनगरात जागोजागी खड्डे



दिनेश कांबळे
नागपूर, दि. १

हुडकेश्वर मार्गावरील म्हाळगीनगर ते पिपळा फाटा या रस्त्यावर पावसाच्या पाण्यामुळे जागोजागी खड्डे पडल्याने नागरिकांना बराच त्रास सहन करावा लागतो. दरवर्षी पावसाळ्याच्या दिवसात या परिसरात हे चित्र पहायला मिळते. थोडासा पाऊस आला तरी रस्त्यावर पाणी जमा होते. रस्त्यावर पाणी जमा होत असल्याने आणि त्यातही मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याने रस्त्यावर खड्डे पडतात. या खड्डयातून मार्गक्रमण करताना वाहनचालकांना बराच त्रास सहन करावा लागतो. वाहनचालकांना खड्डयाचे धक्के खात पुढे जावे लागते. त्यातच खड्डे चुकविताना वाहनचालकाचा तोल जाऊन ते दुचाकीसह खाली पडतात. याच खड्डयाने मागच्या वर्षी एका ॲक्टीवाचालक महिलेचा बळी घेतला होता. तरीही प्रशासनाला जाग आली नाही.

हा रस्ता आणखी किती लोकांचा बळी घेणार असा प्रश्न या परिसरातील नागरिकांना पडला आहे. त्यामुळे प्रशासनाने या मार्गाची त्वरित दुरूस्ती करून वाहनचालकांचे हाल थांबवावेत अशी मागणी परिसरातीला नागरिकांनी केली आहे.

# एकाच आठवड्यात गडर लाईन खचली



प्रदीप पौनीकर
नागपूर, दि. १

प्रभाग क्र. ५ कुंदनलाल गुप्तानगर येथे नव्यानेच टाकलेली गडर लाईन एकाच आठवड्यात खचल्याने गडर लाईनच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

सांडपाणी वाहून जाण्यासाठी कुंदनलाल गुप्तानगर येथे काही दिवसांपूर्वी गडर लाईन टाकण्यात आली होती. मात्र, नित्कृष्ट दर्जाचे काम झाल्याने एकाच आठवड्यात ही गडर लाईन खचली. त्यामुळे लोकांना बराच त्रास होत आहे.

यासंदर्भात आम आदमी पक्षाच्या वतीने सतरंजीपुरा झोनचे सहायक आयुक्त धनंजय जाधव यांना निवेदन देऊन या कामाची चौकशी करण्याची मागणी केली. नित्कृष्ट दर्जाचे काम न केल्यास आणि चौकशी न केल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी हेमराज कुंभारे, अनिल संभे, विजय धकाते, नानक धनवानी, नितीन ब्रम्हपुरीकर, संदीप साखरे, दिलीप रामटेककर, दिलीप टाले, संजू पटेल, सुनील गजभिये, हरिहर पराते, मनोज फटींग, निळकंठ टाकळीकर, विनोद निखारे, बाबुराव निमजे यांचा सहभाग होता.

# बस थांब्याजवळील कचरा कुंडी गायब

महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. १

प्रभाग क्र. १४ सिव्हील लाईन्स येथील जी. एस. कॉलेजसमोर असलेल्या बसथांब्याजवळील कचरा कुंडी गायब झाल्याने प्रवाशांना खाद्यपदार्थांची पाकिटे रस्त्यावरच फेकावी लागत आहेत.

स्वच्छ नागपूर, सुंदर नागपूर असे मनपाचे ब्रिदवाक्य आहे. परिसरातील नागरिकांनी स्वच्छता ठेवावी असे आवाहन मनपातर्फे नियमितपणे केल्या जाते. परंतु, मनपाचे अधिकारीच या आवाहनाचे पालन करीत नसल्याचे दिसून येत आहे.

शहरातील प्रत्येक बसथांब्यावर मनपातर्फे कचरा कुंड्या बसविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे जी. एस. कॉलेजसमोर देखील बसथांब्यावर कचरा कुंडी बसविण्यात आली. या थांब्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी खाद्यपदार्थांची रिकामी पाकिटे या कचरा कुंडीत टाकावित हा या मागील उद्देश आहे. जी. एस. कॉलेजसमोरच लॉ कॉलेज आणि इतर शासकीय कार्यालये आहेत. त्यामुळे या थांब्यावर नेहमीच प्रवाशांची गर्दी असते. सकाळपासून कॉलेजला आलेल्या विद्यार्थ्यांना भूक लागत असल्याने ते खाद्यपदार्थांची पाकिटे घेऊन बसथांब्यावर बसून बसची वाट पहात असतात. खाद्य पदार्थाची रिकामे पाकिटे टाकण्यासाठी कचरा कुंडी नसल्याने विद्यार्थी कुठेही पाकिटे टाकून आपल्या घराचा रस्ता पकडतात. त्यामुळे बसथांब्याभोवती कचरा होतो. दिवसभर ती पाकिटे तशीच पडून असतात. त्यामुळे नागपूर कसे स्वच्छ राहणार असा प्रश्न पडला आहे.

# गणेशपेठ चौकात रस्त्यात खड्डे की, खड्डयात रस्ते

महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. १

अतिशय वर्दळीच्या अशा गणेशपेठ मुख्य बसस्थानक चौकात रस्त्यावर खड्डे पडल्याने रस्त्यावर खड्डे की, खड्डयात रस्ते असा प्रश्न निर्माण झाला आहे.

गणेशपेठ मुख्य बस्थानक चौक हा अतिशय वर्दळीचा चौक आहे. चोहोबाजूने त्या रस्त्यावर बसेसची येजा सुरू असते. त्यामुळे रस्त्यावर खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्डयात पाणी जमा होत असल्याने वाहनचालकांना त्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे वाहनचालक खड्डयात पडून जखमी होत असतात. हे खड्डे बुजविण्यात यावे यासाठी अनेकदा प्रशासनाकडे निवेदने देण्यात आली. मात्र, प्रशासन काहीच लक्ष देत नाही.

याप्रकरणी आम आदमी पार्टीच्या वतीने खड्डयात जलसमाधी आंदोलन करण्याची सूचना केली होती. या आंदोलनाची दखल घेत मनपा प्रशासनाने थातूरमातूर काम करून आंदोलकांना रोखले होते. त्याचप्रमाणे पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. आंदोलनात पक्षाचे शहर संघटनमंत्री गिरीश तितरमारे, रोशन डोंगरे, प्रशांत अहिरराव, जॉय बांगडकर, सचिन लोणकर, मनोज डोंगरे, शिरीष तिडके, ज्योती गौर, अलका पोपटकर, पुष्पा डाबरे, शारदा गौर, रितू तिवारी यांचा सहभाग होता.

# विठ्ठलनगरात समस्याच समस्या

महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. १

दक्षिण नागपुरातील प्रभाग क्र. ३४ येथील विठ्ठलनगरात समस्यांचा महापूर आला असून त्यामुळे परिसरातील नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार त्या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

विजेची समस्या खूपच डोकेदुखी ठरली आहे. दिवसभरात अनेकदा विजप्रवाह खंडीत होत असतो. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. त्यातही संपूर्ण शहरात मच्छरांचा प्रकोप वाढला आहे. त्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सोबतच विठ्ठलनगरात वृद्धांना फिरण्यासाठी आणि लहान मुलांना खेळण्यासाठी चांगल्या प्रकारचा बगिचा नाही आहे. त्यामुळे येथे बगिचा तयार करणे गरजेचे झाले आहे.

याशिवाय मोकाट कुत्र्यांचा त्रास तर भयंकर आहे. कुत्र्यांच्या दहशतीने लोकांमध्ये भिती निर्माण झाली आहे. मोकाट कुत्र्यांना पकडण्यासाठी मनपाचे कर्मचारी फारसे प्रयत्न करीत नाहीत. कुत्र्यांना पकडणारी गाडी आली की, कुत्रे पळून जातात. परंतु, मनपा कर्मचारी काहीच कारवाई करीत नाही. यापूर्वी शिवसेना (उबाठा) दक्षिण नागपूरचे उपजिल्हाप्रमुख मुकेश रेवतकर यांनी मोकाट कुत्र्यांसंदर्भात निवेदन दिले होते. परंतु, मनपा अधिकाऱ्यांनी काहीच लक्ष दिले नाही. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे असेही रेवतकर यांनी सांगितले.